नियमित दिवाणी दावा क्र. २०२/२०१५ नि.४४ व ४६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र १ यांच्यामार्फत दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १, नियम १० अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रतिवादी क्र. १ यांनी असे नमूद केले की मूळ दावा प्रतिवादी यांच्याविरुध्द कायम मनाईसाठी दाखल करण्यात आला होता. मात्र कैफियत सादर करुन प्रतिवादी यांनी वादी विरुध्द उलटमागणी दावा दाखल केला आहे. चौकशी सुरु असताना वादी हजर न राहिल्याने दावा रद्द करण्यात आला. अशा परिस्थीतीत अतिक्रमण केल्यासंदर्भात प्रतिवादी यांनी उलट मागणी दावा केला असून वादी यांनी प्रतिवादी यांच्या गट क्र. १६८ मध्ये अतिक्रमण केल्याची तक्रार केली आहे. सदर गटामधील सहहिस्सेदार व गट क्र. ३२ मधील सहहिस्सेदार यांना दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करणेची मागणी या अर्जानुसार करण्यात आली आहे.

२. या अर्जाला वादी यांनी निशाण ५० येथे आपले म्हणणे सादर केले असून त्यांनी मुळातच उलट मागणी दाव्यास हरकत घेतलेली आहे. त्यांच्यामते सदर उलट मागणी दावा हा मुदतीनंतर दाखल करण्यात आला आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की अतिक्रमणाबाबतचे सर्व आरोप खोटे आहेत. वादी हा त्याच्या भागधरकासह दावा मिळकतीचा मालक आहे. तेथील जिल्हा परिषद रस्त्याच्या जवळच दक्षीणेकडे अंदाजे ५०, ६० फूटावर तो राहतो. सदर रस्ता राज्य मार्ग १४३ ला जोडण्यात आला आहे. त्या रस्त्यामुळे गट क्र. १६८ व ३२ असे विभागलेले आहेत. त्यामुळे अशी विभागणी झाल्यामुळे कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करण्यात आले नाही. त्यांनी पुढे असे नमूद केले की प्रतिवादी म्हणतात त्या व्यक्ती या ताबाधारक नाहीत. त्यांच्यात तोंडी वाटप झाले आहे आणि त्याप्रमाणे स्वतःच्या मालमत्तेत रहात आहेत. वादीकडे गट क्र. ३२ १९८६ पासून ताब्यात आहे. त्यामुळे अशा कारणांवर अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यंनी केली.

३. उभय बाजूंचा युक्तीवाद ऐकला. उलट मागणी दाव्याचे अवलोकन केले. माझे पूर्वाधिकारी यांनी त्यास अनुसरुन वादप्रश्न देखील काढलेले आहेत. उलटमागणी दाव्यामध्ये वादी यांनी प्रतिदावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केल्याची

स्पष्ट तक्रार केली आहे. वादी यांनी अर्जाला दिलेल्या उत्तरामध्ये नमूद केलेली वस्तूस्थीती ही केवळ अर्जातील म्हणण्यावरुन निश्चित करता येणार नाही. त्याकरीता सहभागदार यांना ऐकावे लागणार आहे. मात्र सहभागदार यांना ऐकण्यासाठी त्यांना दाव्याचे कामी सहपक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. असे केल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर सहभागदार हे दाव्यात हजर झाल्यावर आपली बाजू मांडू शकतात आणि तसे करताना वादी यांना देखील त्यांची बाजू सदर मुदयांच्या अनुषंगाने मांडता येणारी आहे. सबब सदर सहभागदार हे दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना उलट मागणी दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करणे गरजेचे आहे. त्याकरीता त्यांना प्रथम ऐकण्याची आवश्यकता नाही.

४. त्याचसोबत निशाण ४६ येथे प्रतिवादी क्र. १ यांच्यामार्फत निशाण ४४ येथील उपरोक्त अर्जला अनुसरुन उलट मागणी दाव्यातील प्रतिवादी यांच्या अनुषंगाने त्या सहभागदारांचे नांव निशाण ४४ वरील अर्जात नमूद करण्याचे राहून गेल्याने वेगळा अर्ज दिला आहे. वास्तविकता निशाण ४४ व निशाण ४६ वरील अर्ज हे एकाच मागणी संदर्भात आहेत. त्यामुळे ते दोन्हीही अर्ज एकत्रीत निकाली काढणे न्यायोचित समजतो. सबब उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे निशाण ४४ वरील अर्ज मंजूर करण्यास पात्र असल्याने मी खालील आदेश परीत करतो–

१. निशाण ४४ व निशाण ४६वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. अर्जात नमूद व्यक्तींना उलट मागणी दाव्यातील प्रतिवादी म्हणून समाविष्ट करुन घेण्यात यावे.
३. प्रतिवादीने तशी दुरुस्ती करुन उलट मागणी दाव्याची प्रत सादर करावी.
४. प्रतिदाव्याची प्रत सादर केल्यावर सदर सहभागदारांना प्रतिदाव्याचे समन्स काढण्यात यावे.

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2022.04.08 11:14:59 +0530

आटपाडी (वि. द. पाटील )

दि. ७. ४.२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर आटपाडी

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - Civil Judge Jr.Dn. Atpadi.
Date - 07.04.2022
Order signed by the
Presiding Officer on - 07.04.2022
Order uploaded on - 08.04.2022